दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १७६५/२०२५
**निशाणी क्रमांकः– ११ खाली**
**देवकी पडघान व इतर वि. कोणीही नाही.**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची शपथेवरील जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नावः– वसंत ज्ञानदेव पडघन

**सरतपास अर्जदार तर्फे वकील श्रीमती. सुवर्णलता माने यांचे मार्फत सुरू**

**०१.** सदर प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे व तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर मी त्यावर सही केली. माझे वडिल व आजीच्या मृत्युच्या दाखल्यांच्या झेरॉक्स प्रती दाखल केल्या आहेत व मुळ प्रती सोबत आणल्या आहेत. मुळ वरून झेरॉक्स पडताळुन पाहिल्या त्या बरोबर आहेत. त्यास **नि. १२ व १३** देण्यात येत आहे. माझ्या वडिलांच्या नावावर असलेल्या नोंदणीकृत मालमत्तेचा करारनामा क्र. ९१९२/२००४ ची मुळ प्रत गहाळ झाल्याबद्दलची तक्रार मी दि. १८/११/२०२५ रोजी खांदेश्वर पोलिस ठाणे येथे दिली होती. सदर तक्रारीची प्रत मी रेकॉर्डवर दाखल केली आहे. त्यास **नि. १४** देण्यात येत आहे. सदर मुळ करारनामा आजपर्यंत सापडलेला नाही. सदर करारनाम्याची प्रमाणित प्रत मी रेकॉर्डवर दाखल केली आहे. त्यास **नि. १५** देण्यात येत आहे. माझ्या वडिलांच्या नावावर असलेल्या नोंदणीकृत मालमत्तेचा करारनामा क्र.५९१३/२००७ ची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ करारनामा सोबत आणला आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळुन पाहिले ते बरोबर आहेत. त्यास **नि. १६** देण्यात येत आहे. वरील दोन्ही मालमत्तांच्या ताबा पावत्यांच्या झेरॉक्स प्रती दाखल केल्या आहेत व मुळ पावत्या सोबत आणल्या आहेत. मुळ वरून झेरॉक्स पडताळुन पाहिल्या त्या बरोबर आहेत. त्यास **नि. १७ व १८** देण्यात येत आहे.

**०२.** दैनिक किल्ले रायगड या पेपरमध्ये दि.१३/०१/२०२६ रोजी जाहिर नोटीस प्रकाशित केली होती तो पेपर मी दाखल केलेला आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.03.10 15:59:34 +0530

**ठिकाणः पनवेल** **(आर. वाय.खंडारे)**
**दिनांकः– १०/०३/२०२६.** **५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल**